समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची प्रशासनात ताकद : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 2

३८ वर्षांनंतर कृषी विभागाला मिळाले नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्य >> पान 3

नगरपरिषद निवडणुका : तिसऱ्या दिवशी फक्त पाच उमेदवारी अर्ज दाखल >> पान 4



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 99 ■ गुरूवार, दि. 13 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**सुविचार**

आत्मविश्वासाने प्रत्येक संकटाचा सामना करा.



रश्मिका जीवनसाथीसाठी गोळी खाण्यासही तयार: म्हणाली, विजय देवरकोंडासाठी मी काहीही करू शकते

आतील पान

# 'माझी लाडकी बहीण' योजनेच्या 'केवायसी'मध्ये अडचणी

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा १६ वा हप्ता महिलांच्या खात्यावर वळता केला जाणार आहे. मात्र त्याआधी लाडक्या बहिणींना ई केवायसी करावी लागणार असल्याचं राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितलं होतं. गेल्या महिन्याभरापासून ई केवायसी करताना मोठा अडचणी येत होत्या. कधी सर्वर डाऊन, कधी ओटीपी न येणे अशा समस्यांमुळे महिला मेटाकुटीला आल्या होत्या. यावरून मंत्री अदिती तटकरेंनी वेबसाईटमध्ये बदल होत असल्यामुळे आणि ई केवायसीसाठी वेळ लागत असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.**

## संकेतस्थळात बदल करत तांत्रिक त्रुटी लवकरच दूर होणार, अदिती तटकरेंनी दिली महत्त्वाची माहिती





मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांच्या आर्थिक मदत केली जाते. या योजनेचा सप्टेंबर महिन्याचा हप्ता १० ऑक्टोबरपर्यंत जमा झाला होता. दिवाळीपूर्वी हा हप्ता जमा होण्याच्या अपेक्षा होती मात्र गेल्या महिन्याभरापासून अनेकांना अडचणी येत होत्या. यावरून मंत्री अदिती तटकरे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या, लाडकी बहीण योजनेच्या वेबसाईटमध्ये काही बदल होत आहेत. त्यामुळे वेळ लागत असल्याचं मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या. ज्या महिलेचा पती आणि वडील नाही अशा महिलांसाठी वेबसाईटवर बदल केले जाणार आहेत. ही प्रक्रिया लवकरच पूर्ण होईल असंही त्यांनी सांगितलं. कोणतीही महिला लाभार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही. अजितदादांनी २४ तासांमध्ये स्पष्टीकरण दिलं आहे. जो तो विरोधक आपली मत व्यक्त करत असतो. राजीनामा आणि इतर गोष्टींचा विषयी येत नाही असे अदिती तटकरे म्हणाल्या. त्यांनी शरद पवार यांची भेट घेत त्यांचा आशीर्वादही घेतला.

गेल्या काही महिन्यांपासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर विरोधक कडवी टीका करताना दिसत आहेत. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर काढलेल्या या योजनेमुळे राज्यातील अनेक विकास कामे करण्यासाठी राज्याकडे पैसे नाहीत. अनेक योजना रद्द करण्याची वेळ सरकारवर आली आहे असे टिका वारंवार होताना दिसत आहे. दुसऱ्या बाजूला लाडक्या बहिणींचा १६ हप्ता जमा होण्यासाठी त्यांना ई केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. इ केवायसी शिवाय पुढील हप्ता त्यांच्या खात्यावर जमा होणार नाही अशा सूचना आहेत. ई केवायसी करण्याची अंतिम तारीख १८ नोव्हेंबर २०२५ आहे.

## लंडन मधील ऐतिहासिक 'इंडिया हाऊस' महाराष्ट्र शासन ताब्यात घेणार - मंत्री आशिष शेलार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** लंडनमधील स्वातंर्त्य सैनिकांचे वास्तव्य असलेल्या ''इंडिया हाऊस''ला महाराष्ट्र शासन ताब्यात घेऊन त्यास स्मारक म्हणून जतन करेल. या 'इंडिया हाऊस'मध्ये स्वातंर्त्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे वास्तव्य होते, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केली.

सांस्कृतिक कार्य मंत्री शेलार हे नागपूरकराच्या रघूजीराजे भोसले यांची ऐतिहासिक तलवार आणण्यासाठी लंडन दौऱ्यावर होते, तेव्हा त्यांनी इंडिया हाऊसला भेट दिली होती. त्यावेळी लंडनस्थीत भारतीयांनी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांनीही ही मागणी केली होती. आज याबाबत मंत्रालय दालनात आमदार देवयानी फरांदे, सामान्य प्रशासन, सांस्कृतिक कार्य, पुरातत्व विभागासह संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेऊन आढावा घेण्यात आला.

या बैठकीत ''मित्रा''च्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्यात सामान्य प्रशासन विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व विभाग आणि वित्त विभागाचा सहभाग असेल. ही समिती 'इंडिया हाऊस' ताब्यात घेण्याबाबतचा सर्वकष अहवाल तयार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादरीकरण मांडण्यात येणार आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

# शिवसेनेवर २१, २२ जानेवारीला सलग २ दिवस होणार सुनावणी

## सुप्रीम कोर्टाने दोन्ही पक्षांना युक्तिवाद करण्यासाठी दिला ५ तासांचा अवधी

**मुंबई/प्रतिनिधी : शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्हाची सुनावणीसाठी आता नवीन तारीख मिळाली आहे. या दोन्ही पक्षांच्या वादावर आता सर्वोच्च न्यायालय पुढच्या वर्षी म्हणजे, २१ जानेवारी रोजी सुनावणी करणार आहे. म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळपास पार पडल्यानंतर याचा फैसला होण्याची शक्यता आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पक्ष आणि चिन्हाचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे.**



केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष हा एकनाथ शिंदे यांचा तर राष्ट्रवादी हा अजित पवारांचा पक्ष असल्याचा निर्णय दिला. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि शरद पवारांच्या गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. शिवसेना आणि राष्ट्रवादी संबंधी १२ नोव्हेंबर रोजी सुनावणी पार पडली. त्यानंतर आता २१ जानेवारी ही पुढची तारीख देण्यात आली आहे. त्या दिवशी पहिल्यांदा शिवसेना प्रकरणात युक्तिवाद होणार आहे. शिवसेनेच्या प्रकरणानंतर राष्ट्रवादीचे प्रकरणही ऐकले जाईल. त्यासाठीही दोन्ही गटांना दोन तासांचा वेळ देण्यात येणार आहे. ही सुनावणी २१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या पुढच्या तारखेपर्यंत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपण्याची चिन्हे आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या २६ जानेवारी २०२६ पर्यंत घ्याव्यात असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यानंतर आता २ डिसेंबर रोजी नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका होत आहेत. त्यानतर जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नंतर महापालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. शिवसेना पक्ष आणि या पक्षाचं निवडणूक चिन्ह असलेला धनुष्यबाण कोणाचा, या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. २०२२ साली एकसंध शिवसेनेतून फुटलेल्या एकनाथ शिंदे यांचा पक्ष हाच खरा शिवसेना पक्ष असल्याच्या आणि त्यांना धनुष्यबाण हे चिन्ह वापरण्यास मुभा देणाऱ्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. या प्रकरणाच्या सुनावणीकडे अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.

गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असलेलं हे प्रकरण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांआधी निकाली लागणार का, याविषयी महाराष्ट्रातल्या जनतेच्या मनात उत्सुकता निर्माण झाली होती. पण आता पुढच्या तारखेमुळे त्याची शक्यता मावळण्याची चिन्हे आहेत.

# दिल्ली स्फोटानंतर महाराष्ट्र एटीएसची मोठी कारवाई

## मुंब्रा येथील शिक्षकाच्या घरी छापेमारी, कुर्ल्यातील पत्नीच्या घरीही धाड; चौकशी सुरू

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यातील अल कायदा प्रकरणाचे धागेदोरे आता मुंब्र्यापर्यंत पोहोचले आहेत. पुणे एटीएस ने सॉफ्टवेअर इंजिनिअर जुबेर इलियास याला अटक केल्यानंतर, महाराष्ट्र एटीएस ने मुंब्रा आणि कुर्ला येथे अनेक ठिकाणी छापे टाकले आहेत. या कारवाईत इब्राहीम अबिदी नावाच्या एका शिक्षकाला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात येत आहे. एटीएसला संशय आहे की, 'हा मुलांना दहशतवादी कृत्यांसाठी प्रवृत्त करत होता'. अबिदीच्या घरातून इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त करण्यात आल्या असून, त्याचा तपास केला जाणार आहे. ही कारवाई 'अल कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट' या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ जिहादचा प्रसार करण्याच्या आरोपाखाली अटक केलेल्या जुबेर इलियास प्रकरणाचा भाग असल्याचे सांगितले जात आहे.

पुणे एटीएसने मुंब्रा कोसा येथे इब्राहिम आबिदी यांच्या घरी छापेमारी केली. मुंब्रा येथील घरी छापेमारी केल्यानंतर आबिदीच्या कुर्ला येथील घरावरही एटीएसने शोधमोहिम केली. मात्र लाकडाऊननंतर आबिदी याने दुसरं लग्न केलं, ते मुंब्रा येथे रहावयास गेल्यानंतर या कुटुंबियांशी फारसा संबध ठेवला नसल्याची माहिती कुटुंबियांनी दिली. दिल्ली स्फोटांनंतर राज्यातील यंत्रणा सतर्क झाली आहे. अशातच मुंब्र्यात दहशतवाद विरोधी पथकाचं धाडसत्र सुरु असल्याची माहिती पुढे आली आहे. यात शिक्षक असलेल्या इब्राहिम आबिदी यांच्या मुंब्रा आणि कुर्ला येथील घरावर एटीएसने धाड टाकली. यावेळी घरातून मोबाईल, लॅपटॉप, हार्ड डिस्क जप्त करण्यात आलीय. तर पुण्यातील जुबैर हंगरगेकर यांच्या प्रकरणाशी संबंध असल्याच्या संशयावरून एटीएसने हि कारवाई केली आहे.

अल-कायदा इन इंडियन सबकाँटिनेंट संघटेंनेचा समर्थक असल्याचा आणि जिहादचा कथित प्रचार केल्याप्रकरणी हंगरगेकरला अटक झाली होती. मात्र इब्राहिम आबिदींच्या कुटुंबियांकडून या आरोपांचा खंडन करत सांगितलं कि, इब्राहिम आबिदी मदरश्यात उर्दू शिकवत नसून साबू सिद्दीकी महाविद्यालय ३५ वर्षांपासून प्राध्यापक असल्याची कुटुंबीयांनी माहिती दिलीय. तर सर्च वॉरांट घेऊन आलेल्या पोलिसांना सहकार्य केल्याचा कुटुंबियांकडून दावा करण्यात आला आहे. त्यांच मुंब्र्यात आणि कुर्ल्यात अशी दोन घर असल्याची माहिती आहे.

# शिवसेनेचा गड 'दुभंगला'

## मेहकर नगरपरिषदेच्या निवडणुकीत दोन शिवसैनिक आमने-सामने!

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर :** राजकीय दृष्टिकोनातून जिल्ह्यातील मेहकर मतदारसंघ हा नेहमीच चर्चेत राहिलेला आणि राजकारणातील केंद्रबिंदू मानला जाणारा मतदारसंघ आहे. याच मेहकर नगरपरिषदेच्या निवडणुकीत आता नगराध्यक्ष पदासाठी दोन शिवसैनिक आमने-सामने येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शिवसेनेचा गड असलेल्या या भागात आगामी निवडणूक चुरशीची होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे हे होम ग्राऊंड मानले जाते. अनेक वर्षांपासून येथे शिवसेनेचे वर्चस्व दिसून आले. मात्र, पक्षात झालेल्या फाटाफुटीनंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि शिंदे गट अशा दोन शिवसेना निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवरही शिवसैनिकांमध्ये मतभेद तीव्र होत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.





मागील विधानसभा निवडणुकीत मेहकर मतदारसंघात उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या उमेदवाराला विजय मिळाला होता. त्यामुळे या गटाचा प्रभाव नगरपरिषद पातळीवरही टिकून राहील, अशी अपेक्षा होती. परंतु, आगामी नगरपरिषद निवडणुकीतही दोन्ही गट आमने-सामने येण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून नगराध्यक्षपदासाठी किशोर भास्करराव गारोळे यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली आहे.

तर शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाकडून अजय उमाळकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब आहे. या दोन माजी शिवसैनिकांमध्ये थेट सामना होत असल्याने शिवसेनेचा पारंपरिक मतदार गोंधळात पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, नगरपरिषद निवडणुकीतील निकालावर याचा थेट परिणाम होऊ शकतो.

### मेहकरमध्ये नव्या चेहऱ्याची चर्चा; निवडणुकीत वाढणार चुरस

आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मेहकरमधील राजकीय हालचालींना वेग आला आहे. यावेळी काँग्रेससह इतर घटक पक्षांचे उमेदवारही रिंगणात उतरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मेहकर नगरपरिषद निवडणूक चुरशीची होणार, अशी चिन्हे दिसत आहेत.

राजकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, मेहकर हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला असला तरी पक्षातील फूट आता प्रत्यक्षात दिसून येत आहे. दोन्ही गटांमधील स्पर्धेमुळे इतर पक्षांना या लढतीत संधी मिळू शकते.''

आता या नगरपरिषद निवडणुकीत कोणाचा पल्ला भारी पडतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. मात्र एक गोष्ट निश्चित मेहकरमध्ये दोन शिवसैनिकांच्या आमने सामनीने निवडणुकीचा रंग अजूनही अधिक गडद झाला आहे.

अनेक वर्षांपासून एकाच पक्षाच्या उमेदवाराला संधी देणाऱ्या मेहकरकर मतदारांचा कल यावेळी बदलताना दिसत आहे. स्थानिक राजकारणात नव्या चेहऱ्यांची चर्चा जोमाने सुरू असून, मतदार नव्या पर्यायांच्या शोधात असल्याचे तज्ञांचे मत आहे.

जुने चेहरे आणि पारंपरिक उमेदवारांबाबत मतदारांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत. त्यामुळे या पार्श्वभूमीवर नव्या नेतृत्वाला संधी देण्याचा विचार मेहकरकर करत असल्याचे राजकीय जाणकारांचे निरीक्षण आहे.

प्रमुख पक्षांकडून उमेदवारांची घोषणा आगामी काही दिवसांत होण्याची शक्यता असून, त्यानंतर मेहकरमधील राजकीय समीकरणांना अधिक स्पष्ट दिशा मिळेल. मात्र सध्या तरी नव्या चेहऱ्यांच्या चर्चेमुळे मेहकरचे राजकारण तापले आहे, एवढे मात्र निश्चित.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## डॉ. कंबरतोड हड्डीवाले



## सार्वभौमत्वावर हल्ला

भारताची राजधानी असलेल्या दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी भीषण आत्मघाती हल्ला झाला. एका मोटारीत झालेल्या भीषण स्फोटाने केवळ राजधानीच नव्हे तर संपूर्ण देश हादरला. या भीषण स्फोटात १३ निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला तर २५ हून अधिक नागरिक जबर जखमी झाले. या हल्ल्यानंतर संपूर्ण देशात हाय लर्ट घोषित करण्यात आला. केंद सरकारने या भ्याड हल्ल्याचा तपास एनआयएकडे सोपवला आहे. एनआयए या हल्ल्याचा योग्य तपास करून यामागे कोण आहे हे शोधून काढतीलच पण हा हल्ला पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी घडवला हे शाळकरी मुलेही सांगू शकेल. मागील काही वर्षापासून शांत असणारे दहशतवादी पुन्हा सक्रिय झाले आहेत हेच या हल्ल्यातून स्पष्ट होते. भारतात दहशतवादी कारवाया करून निष्पाप नागरिकांना टार्गेट करायचे आणि देशात अशांतता माजवायची त्यातूनच देशात धार्मिक दंगली घडवून देशात अराजकता माजवण्याचा दहशतवाद्यांचा मनसुबा आहे. भारतासोबत समरोसमोर युद्ध करून आपण जिंकू शकू नाहीत हे पाकिस्तानला ऑपरेशन सिन्दुर नंतर समजले असेल म्हणूनच त्यांनी पुन्हा एकदा आपला जुना पॅटर्न वापरायला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी दहशतवाद्यांना पुन्हा सक्रिय केले. या हल्ल्याच्या आदल्या दिवशीच तीन शहरांमध्ये रासायनिक हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा महाभयानक कट पोलिसांनी उघडकीस आणला. गुजरात पोलिसांच्या कारवाईपाठोपाठ जम्मू काश्मीर पोलिसांनी दहशतवाद्यांचे जाळे उद्ध्वस्त करून सात जणांना अटक केली. हरियाणातील फरीदाबरमधून तब्बल तीन हजार किलो आरडीएक्स हस्तगत केले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. सुरक्षा यंत्रणेचे याबाबत कौतुकच करायला हवे. जर ही स्फोटके सापडली नसती आणि दहशतवाद्यांचे मनसुबे यशस्वी झाले असते तर देशात हाहाकार उडाला असता. हरियाणा, जम्मू काश्मीर प्रमाणे दिल्लीतील स्फोट मात्र सुरक्षा यंत्रणेला रोखता आला नाही त्यामुळे निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला. २०११ नंतर पहिल्यांदाच दिल्लीत इतका भीषण हल्ला झाला. हा हल्ला म्हणजे भारतीय सार्वभौमत्वावर केलेला हल्ला आहे म्हणूनच याचा बदला घ्यायला हवा. भारताने या हल्ल्याचा बदला घेऊन दहशतवाद्यांना जशास तसे उत्तर द्यायला हवे. काही महिन्यांपूर्वी दहशतवाद्यांनी पहलगाम येथे अशाच प्रकारे निष्पाप नागरिकांना टार्गेट करून जीवे मारले. त्यानंतर भारताने पाकिस्तामात घुसून दहशतवाद्यांची तळे उद्ध्वस्त केली आणि १०० हून अधिक दहशतवाद्यांना ढगात पाठवले. कदाचित त्यामुळेच चवताळलेल्या दहशतवाद्यांनी देशात दहशतवादी कारवायांना सुरुवात केली असेल. अर्थात दहशतवाद्यांना याचीही शिक्षा मिळणार यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर राबवून भारतीय सैन्याने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला भविष्यात ऑपरेशन सिन्दुर पार्ट २ राबवून दिल्ली हल्ल्याचाही बदला घेतला जाईल. सरकार त्यांचे काम करेलच पण आता नागरिकांचीही जबाबदारी वाढली आहे. आपल्या शहरात, परिसरात काही संशयास्पद गोष्टी घडत असल्याची शंका जरी नागरिकांना आली तरी नागरिकांनी पोलिसांना त्याची माहिती द्यावी. दहशतवाद्यांचे स्लीपर सेल शहाराशहरात अस्तित्वात असण्याची शक्यता आहे. जर अशाप्रकारे कोणता व्यक्ती किंवा संघटना संशपस्पद कृत्य करताना आढळले तर त्याची सूचना पोलिसांना द्यावी. कोणत्याही बेवारस वस्तूंना हात लावू नये. बेवारस वस्तू जर आढळल्या तर त्याचीही सूचना पोलिसांना द्यावी. नागरिकांनी सतर्क राहिल्यास दहशतवाद्यांचे मनसुबे सफल होणार नाहीत. दहशतवादी म्हणजे माणुसकीचे शत्रू आहेत. माणुसकीच्या शत्रूंना नामोहरण करण्याची जबाबदारी जितकी सरकारची आहे तितकीच नागरिकांचीही आहे.

# समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची प्रशासनात ताकद : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांसमवेत संवाद

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** समाजातील शेवटच्या घटकाचे कल्याण हे ध्येय ठेवत त्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रशासनात आहे. त्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेचा उपयोग करावा. राज्याच्या विकासगाथेला पुढे नेण्याची जबाबदारी सार्थपणे सांभाळण्याची अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. प्रशासनात आलेल्या तुकडीने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करत नागरिक केंद्रित व जबाबदार प्रशासन व्यवस्था निर्माण करावी, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

२०२४ च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील आठ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी वर्षा निवासस्थानी संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी उपस्थित होते.

संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी विकास केंद्रित प्रशासन गरजेचे आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे नागरी प्रशासनात मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी आहे.

संतुलित व सर्वांगीण औद्योगिक विकासासाठी शासन १०० सुधारणा करीत आहे. या सुधारणांसाठी 'वॉर रूम' तयार करण्यात आली आहे. महसूल सुधारणांसाठी सल्लागार नेमण्यापेक्षा प्रशासनातील दांडगा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा खूप चांगला परिणाम दिसून येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शासनाने औद्योगिक प्रयोजनासाठी राज्यामध्ये अकृषक परवाना काढण्याची मोठी सुधारणा नुकतीच केली आहे. वेळखाऊ आणि क्लिष्ट प्रक्रिया दूर करीत राज्यात गतिमान प्रशासन देण्यावर शासनाचा भर आहे. महसूल विभाग अंतर्गत बरीच प्रक्रिया, सेवा ब्लॉक चेन पद्धतीवर आणण्यात येत आहे. त्यामुळे बऱ्याच प्रक्रिया जलद व अचूक होत आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संपूर्ण प्रशासकीय धोरणे, प्रक्रिया यांचे 'व्हिजिट' करून 'रिइंजिनिअरिंग' करण्यासाठी शासनाने १५० दिवसांचा कार्यक्रम आखला आहे. या माध्यमातून बऱ्याच सुधारणा करण्यात येत आहेत. राज्यात सार्वत्रिक औद्योगिक विकास होण्यासाठी गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. मुंबई, पुणे प्रमाणेच छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक यासह राज्यात अन्य भागात नवीन औद्योगिक पट्टे निर्माण करण्यात येत आहे. विदर्भामध्ये नागपूर – अमरावती औद्योगिक विकासाचा पट्टा तयार होत आहे. अमरावतीमध्ये पीएम मित्रा पार्क तसेच वस्त्रोद्योग पार्कमुळे औद्योगिक विकासाची परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. त्याचा परिणाम म्हणून अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीत आज एकही भूखंड शिल्लक राहिलेला नाही. अमरावती विमानतळ नागरी वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहे. या ठिकाणी एअर इंडियाच्यावतीने आशिया खंडातील सर्वात मोठे 'पायलट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट' उभारण्यात येत आहे. दुर्गम, नक्षलग्रस्त असलेल्या गडचिरोलीची ओळख आता 'स्टील सिटी' म्हणून होत आहे. या जिल्ह्यात तीन लाख कोटींचे सामंजस्य करार उद्योगांसाठी करण्यात आले आहेत. समृद्धी महामार्गाने राज्याची राजधानी व उपराजधानी जोडली आहे. त्यामुळे गतीने दळणवळण यंत्रणा निर्माण झाली आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी शक्तीपीठ महामार्ग महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. टोयोटा किर्लोस्कर कंपनी छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रकल्प स्थापन करीत आहे. त्यामुळे या भागात विकासाची परिसंस्था अधिक बळकट होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिचय करून घेतला. त्यांचा आतापर्यंतचा प्रवास, मागील अनुभव, महाराष्ट्रात काम करत असताना जाणवलेल्या चांगल्या बाबी, सुधारणा करणे गरजेचे असलेल्या बाबी याविषयीही विस्तृत संवाद साधला.

# सहमतीने लैंगिक संबंध वय १८ वरून १६ करण्याची मागणी

### सर्वोच्च न्यायालयात काय होणार? केंद्र सरकारचा कडाडून विरोध

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालय आज संमतीचे कायदेशीर वय १८ वरून १६ वर्षे करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की हा मुद्दा अत्यंत संवेदनशील आहे आणि तो खटल्याच्या तुकड्यांमध्ये न ऐकता सतत सुनावणी घेण्यास प्राधान्य देईल. वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी २४ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, १६ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलांमधील संमतीने लैंगिक संबंधांना लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण (पोस्को) कायदा, २०१२ आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ३७५ अंतर्गत गुन्हा मानणे चुकीचे आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, जर या प्रकरणाची सतत सुनावणी झाली तर संबंधित सर्व समस्या पूर्णपणे सोडवता येतील. केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे की, अल्पवयीन मुलांना लैंगिक शोषणापासून वाचवण्यासाठी संमतीचे कायदेशीर वय १८ वर्षे राखणे आवश्यक आहे.

केंद्राने म्हटले आहे की संमतीचे वय कमी करणे किंवा जवळच्या वयाचा अपवाद जोडल्याने बाल संरक्षण कायद्याचा पाया कमकुवत होईल आणि शोषण आणि तस्करीचा धोका वाढेल. सरकारने म्हटले आहे की न्यायालयांनी प्रत्येक प्रकरणाचा निर्णय घ्यावा; तो सामान्य अपवाद म्हणून कायद्यात समाविष्ट करू नये. अधिवक्ता जयसिंग यांनी १६ ते १८ वर्षे वयोगटातील संमतीने झालेल्या लैंगिक संबंधांची उदाहरणे दिली, परंतु तरीही त्यांच्यावर खटला चालवला जातो. त्यांनी स्पष्ट केले की अशा प्रकरणांमध्ये, संमती दिली तरीही, किशोरांना कायदेशीर खटल्यांना सामोरे जावे लागते, ज्याचा त्यांच्या भविष्यावर परिणाम होतो. निपुण सक्सेना विरुद्ध भारतीय संघ या प्रकरणाचा दाखला देत त्यांनी असा युक्तिवाद केला की न्यायालयाने या सर्व मुद्द्यांचा एकत्रितपणे विचार करावा.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वीच छत्तीसगड उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश रमेश सिन्हा यांनी बलात्काराच्या एका प्रकरणात असा निर्णय दिला आहे की जर पीडित महिला प्रौढ असेल आणि तिने त्या पुरूषाशी बराच काळ शारीरिक संबंध ठेवले असतील आणि त्याला तिचा पती समजून त्या पुरूषाशी दीर्घकाळ शारीरिक संबंध ठेवले असतील तर तो बलात्कार मानला जाऊ शकत नाही. यावरून स्पष्ट होते की ती स्वेच्छेने त्याच्यासोबत राहत होती. आपल्या निर्णयात, उच्च न्यायालयाने रायगड फास्ट ट्रॅक कोर्टाचा दोषसिद्धीचा आदेश रद्द केला.

बिलासपूरमध्ये राहणाऱ्या एका महिलेने रायगडमधील चक्रधर नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तिने सांगितले की, आरोपीने २००८ मध्ये लग्नाच्या बहाण्याने तिचे लैंगिक शोषण सुरू केले. ही महिला पूर्वी बिलासपूरमध्ये राहत होती आणि एका एनजीओमध्ये काम करत होती, जिथे ती आरोपीला भेटली. यादरम्यान, त्याने तिला तिच्या मद्यपी पतीला सोडून जाण्यास सांगितले आणि नंतर तिच्याशी लग्न करण्याचे आश्र्वासन दिले. महिलेने सांगितले की आरोपीने तिला घर भाड्याने देण्याची व्यवस्था केली आणि तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. या काळात त्यांना तीन मुलेही झाली.

# रश्मिका जीवनसाथीसाठी गोळी खाण्यासही तयार: म्हणाली, विजय देवरकोंडासाठी मी काहीही करू शकते

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय क्रश अभिनेत्री रश्मिका मंदान्ना हिचा नवीन चित्रपट ''द गर्लफ्रेंड'' शुक्रवारी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. दरम्यान, रश्मिका मंदान्ना हिने तिच्या लग्नाबद्दल एक हृदयस्पर्शी विधान केले आहे. अलिकडेच झालेल्या एका कार्यक्रमात रश्मिका म्हणाली की तिला विजय देवरकोंडा सोबत लग्न करायचे आहे आणि ती तिच्या जीवनसाथीसाठी काहीही करण्यास तयार आहे, अगदी गोळीही खाण्यास तयार आहे.

रश्मिका म्हणाली, ''मला अशी व्यक्ती हवी आहे जी समजून घेण्यास तयार असेल. अशी व्यक्ती जी खरोखर चांगली असेल आणि माझ्यासोबत किंवा माझ्यासाठी लढेल. उद्या जर माझ्याविरुद्ध युद्ध झाले तर मला माहित आहे की ती व्यक्ती माझ्यासोबत लढेल. मीही तेच करेन. मी कोणत्याही दिवशी त्याच्यासाठी गोळी खाण्यास तयार आहे.'' तिने असेही सांगितले की तिचा आदर्श जीवनसाथी असा असेल जो जीवनाला खोलवर समजून घेईल आणि प्रत्येक परिस्थिती त्यांच्या दृष्टिकोनातून पाहील.

त्याच कार्यक्रमात, रश्मिकाने गमतीने सांगितले की जर तिला विचारले गेले की ती कोणत्या अभिनेत्यांना डेट करेल, लग्न करेल किंवा मारेल, तर ती लग्नासाठी विजय देवरकोंडाचे नाव घेईल.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, रश्मिका आणि विजय यांचा नुकताच साखरपुडा झाला आहे. आणि ते २६ फेब्रुवारी २०२६ रोजी उदयपूरमध्ये लग्न करणार आहेत. हे जोडपे बॉलिवूड आणि दक्षिण भारतीय प्रेक्षकांमध्ये खूप लोकप्रिय आहे.

# बुलढाण्यात जिल्हास्तर युवा महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन समिती, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तर युवा महोत्सव जिल्हा क्रीडा संकुल, जांभरुन रोड, बुलढाणा येथे उत्साहात पार पडला. विविध कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील युवकांनी या महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.







महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन दि. ६ नोव्हेंबर रोजी सकाळी करण्यात आले. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम लोकनृत्य, लोकगीत, कथालेखन, काव्यलेखन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान मेळावा आदींचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवातील विजेते स्पर्धक अमरावती विभागीय युवा महोत्सवात बुलढाणा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक दत्तात्रय बिराजदार, सेवानिवृत्त कर्मचारी अजयसिंह राजपूत, जिल्हा युवा अधिकारी उपस्थित होते.

अमोल गायकवाड यांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा संदर्भ देत युवकांमध्ये संयम, तळमळ, तेज, आदर, देशप्रेम आणि नशापासून दूर राहण्याचे गुण असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी मोबाईल आणि मादक पदार्थांपासून दूर राहून देश, समाज आणि कुटुंबाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

अजयसिंह राजपूत यांनी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या या व्यासपीठाचा लाभ घेऊन सर्व स्पर्धकांनी आपली कला सादर करण्याचे आवाहन केले. तर दत्तात्रय बिराजदार यांनी प्रत्येक स्पर्धा ही जीवनाचा भाग असल्याचे सांगत युवकांना उत्कृष्टतेसाठी सतत प्रयत्नशील राहण्याचा संदेश दिला.

प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले. त्यांनी युवा महोत्सवाचा उद्देश स्पष्ट करताना युवकांना त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे आणि बुलढाणा जिल्ह्याचे नाव विभागीय, राज्य व राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करण्याचे आवाहन केले.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी परीक्षक म्हणून टिळक क्षिरसागर, गजानन लोहटे, वैभव वाघमारे, डॉ. सुभाष चिंचोले, डॉ. सिध्देश्वर नवलाखे, डॉ. मनिषा राऊत, डॉ. संगिता पवार, वैशाली तायडे, एकनाथ इंगळे, विक्रम धावंजेवार, अमर चिंतळे, धनंजय महितकर, सुभाष देशमुख आदींनी कार्य केले.

कार्यक्रमाचे संचलन गजेंद्रसिंह राजपूत यांनी तर आभार प्रदर्शन रविंद्र धारपवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उज्वला लांडगे, मनोज श्रीवास, विनोद गायकवाड, भिमराव पवार, सुहास राऊत आदींनी विशेष परिश्रम घेतले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ३८ वर्षानंतर कृषी विभागाला मिळाले नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्य

## नव्या बोधचिन्ह आणि घोषवाक्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण
## हा लोगो म्हणजे नव्या युगातील नव्या कृषी विचारांचा आरंभ आहे - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्य कृषी विभागाच्या नवीन बोधचिन्हाचे तसेच शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी या नवीन घोषवाक्याचे अनावरण केले.

सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मुख्य उपस्थितीत कृषी विभागाच्या नव्या बोधचिन्ह आणि घोषवाक्याचं अनावरण करण्यात आलं. तसेच बोधचिन्ह स्पर्धेतील विजेता आणि घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री गिरीश महाजन, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश कुमार, कृषि आयुक्त सुरज मांढरे, उपसचिव प्रफुल्ल ठाकूर, संचालक रफिक नाईकवाडी, कृषी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.




**लोगोमधून शेतकऱ्यांची शक्ती, तंत्रज्ञान, आणि पर्यावरणपूरक विकासाचा संदेश: कृषी मंत्री दत्तात्रय भरणे**

महाराष्ट्राची शेती ही परंपरेशी जोडलेली असूनही सतत नव्या दिशेने वाटचाल करणारी आहे. कृषी विभागाचे हे नवे बोधचिन्ह म्हणजे केवळ प्रतीक नाही, तर महाराष्ट्राच्या शेतीचा आधुनिक चेहरा आहे. या लोगोमधून शेतकऱ्यांची शक्ती, तंत्रज्ञान, आणि पर्यावरणपूरक विकासाचा संदेश दिला आहे. हे बोधचिन्ह आणि घोषवाक्य राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या प्रगतीचे प्रतीक बनेल. हा बदल म्हणजे 'नव्या युगातील नव्या कृषी विचारांचा आरंभ' आहे. अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहीतीनुसार, ''कृषी विभागाचे विद्यमान बोधचिन्ह सुमारे ३८ वर्षांपूर्वी तयार करण्यात आले होते. या कालावधीत शेतीत तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण, नैसर्गिक शेती, हवामानबदल आणि उत्पादनाच्या नव्या दिशा अशा अनेक मूलभूत परिवर्तनांच्या पार्श्वभूमीवर विभागाची दृश्य आणि संवादात्मक ओळख अद्ययावत करण्याची गरज निर्माण झाली होती. या उद्देशाने कृषी विभागाने खुली स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत जास्तीत जास्त प्रस्ताव प्राप्त व्हावे यासाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळावर सार्वजनिक आवाहन समावेशित करण्यात आले. कला महाविद्यालयातील आणि कृषी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, कलाकार, डिझायनर्स, लेखक, अधिकारी, कर्मचारी आणि अन्य इच्छुक व्यक्तींना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या स्पर्धेला अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला ज्यात एकूण ७६१ बोधचिन्ह प्रस्ताव आणि ९४९ घोषवाक्य प्रस्ताव प्राप्त झाले.'

श्री. भरणे पुढे म्हणाले, प्राप्त प्रस्तावांचे परीक्षण करण्यासाठी कृषी आयुक्तांच्या मान्यतेने समिती गठित करण्यात आली. या समितीने प्रत्येक प्रस्तावाचा तपशीलवार अभ्यास करून उत्कृष्ट कल्पनांची निवड केली. अंतिम निवड समितीने शासनास प्रत्येकी तीन बोधचिन्ह आणि तीन घोषवाक्यांची शिफारस केली, ज्यांपैकी एकाची अंतिम निवड शासनाने केली. ७ नोव्हेंबर २०२५ ला या नव्या बोधचिन्ह आणि घोषवाक्याला कृषी विभागाकडून मान्यता देण्यात आली आणि आज याचं अनावरण करण्यात आलं. बोधचिन्ह स्पर्धेतील विजेते श्री. विरेंद्र भाईदास पाटील (क्रेझी क्रिएशन्स, भुसावळ) आणि घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्या श्रीमती सिद्धी भारतराव देसाई (परभणी) असून त्यांचं कृषी विभागातर्फे अभिनंदन करतो.

**भविष्यातील वापर आणि अधिकार**

या नव्या उपक्रमामुळे कृषी विभागाची दृश्य ओळख अधिक सशक्त होणार असून, यापुढे कृषी विभागाच्या सर्व अधिकृत उपक्रमांमध्ये हे नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्य वापरले जाणार आहे. हे चिन्ह आणि घोषवाक्य हे कृषी विभागाची मालमत्ता असून, त्याचा अनधिकृत वापर केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## महत्त्वाचे...

### बोगस डॉक्टरांनी हॉस्पिटलचा सेट उभारत नाशिकच्या चार जणांना घातला तब्बल एक कोटीचा गंडा

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** जुन्या इमारतीत मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचा सेट उभारत, मेडिकल, पॅथॉलॉजी लॅब चालवण्याचे टेंडर देत दोन बोगस डॉक्टरांनी चार जणांना एक कोटीचा गंडा घातला आहे. या प्रकरणी नाशिकच्या पंचवटी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी प्रशांत पवार यांची २०२२ मध्ये रवीकांत शेवाळे, संस्कार शेवाळे आणि ठाणे येथील रवींद्र रोकडे यांच्याशी ओळख झाली होती. त्यांनी, आम्ही डॉक्टर असून भिंवडी तेथे मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल सुरू करत आहोत असं सांगितलं. तेथे मेडिकल, पॅथॉलॉजी लॅब चालवण्याचं टेंडर काढलं असून गुंतवणूक करण्यास सांगितलं. पवार यांनी ओळखीचे निर्मल कुमार शर्मा, संजीवन म्हात्रे, राहुल निकम यांच्याशी संशयितांशी बैठक करून दिली. त्यांनी फिर्यादींना भिंवडी तेथे जुन्या इमारतीमध्ये हॉस्पिटलचा सेट दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्याकडून १ कोटी १५ लाख रुपये घेत फसवणूक केली. याप्रकरणी नाशिकच्या पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुन्नाभाई चित्रपटाप्रमाणे हॉस्पिटलचा सेट - संशयित रोकडे आणि शेवाळे यांनी डॉक्टर असल्याचं भासवत मुन्नाभाई एमबीबीएस चित्रपटाप्रमाणे जुन्या भिवंडी येथील एका जुन्या इमारतीमध्ये मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचा सेट उभारला होता. मेडिकल, पॅथॉलॉजी लॅब चालवण्याचं टेंडर देत त्यांनी फिर्यादींची १ कोटी १५ लाखांची फसवणूक केली. या बोगस डॉक्टरांनी नाशिकप्रमाणे मुंबई, ठाणे येथील गुंतवणूकदारांची अशाच प्रकारे फसवणूक केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

कुठल्याही आमिषाला बळी पडू नका - पैशाची गुंतवणूक करताना अगोदर प्रोजेक्टची माहिती घ्या, मगच गुंतवणूक करा. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका, अशाप्रकारे गुंतवणूक आणि अधिक परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक केली असल्यास तक्रार करा, असे आवाहन पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील यांनी केले आहे.

### बाल कामगार प्रथेविरोधी सप्ताहाचे १४ ते २० नोव्हेंबर कालावधीत आयोजन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** १४ नोव्हेंबर बाल दिन या दिवसाचे औचित्य साधत सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयामार्फत १४ ते २० नोव्हेंबर कालावधीत बाल कामगार प्रथेविरोधी सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. या सप्ताहामध्ये प्रामुख्याने स्वाक्षरी मोहीम अभियान, दुकाने व आस्थापनांच्या ठिकाणी दर्शनी भागात बालकामगार कामावर न ठेवण्याबाबतचे स्टिकर्स लावणे, कृती दलामार्फत धाडसत्रांचे आयोजन करुन विटभट्टी, खडीक्रशर, हॉटेल, दुकाने, चहा टपरी, गॅरेज इ. ठिकाणी तपासणी करुन बालमजुरांची मुक्तता करणे, हॉटेल असोसिएशन, दुकाने व व्यापारी असोसिएशन, औद्योगिक क्षेत्रातील मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन आणि कामगार संघटना यांच्या बैठका घेवून सुधारित बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन), १९८६ मधील तदतुदींची माहिती देणे, या बैठकांमध्ये बाल कामगार कामावर न ठेवण्याबाबत सामुदायिक शपथ घेणे व हमीपत्र घेणे आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती सहाय्यक कामगार आयुक्त विशाल घोडके यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

# सुप्रिया सुळेंचा अजित पवारांना 'युती'चा प्रस्ताव

## अजित पवार गटाच्या नेत्याचा दावा; 'स्थानिक'च्या निवडणुकांत दोन्ही पवार एकत्र दिसणार?

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली असून २४६ नगरपालिका आणि १८ नगरपंचायतींसाठी मतदानाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे, स्थानिक पातळीवर घडामोडींना वेग आला असून काँग्रेसने मुंबई महापालिका स्वतंत्र लढवण्याचा निर्धार केला आहे. तर, शरद पवारांच्या राष्ट्रवादीने भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत टायमिंग साधल्याचं दिसून येत आहे. एकीकडे बीड, चंदगड, बार्शीसह अनेक ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येत असल्याचं चित्र असतानाचा आता सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते अजित पवार यांच्याकडे प्रस्ताव ठेवल्याची माहिती आहे.

आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने पवार काका-पुतणे पुन्हा एकत्र येणार असल्याच्या घडामोडींना वेग आला आहे. त्या दृष्टीने सर्वात महत्वाची अपडेट एबीपी माझावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षांनी बोलून दाखवलीय. अजित पवार आणि सुप्रिया सुळे या भाऊ-बहिणींचा एकत्र येण्याबाबत



संवाद झाला आहे. अजित दादा काका शरद पवार यांच्याशी याबद्दल अंतिम चर्चा करणार आहेत, असा दावा पिंपरी चिंचवडमधील अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी म्हटलं आहे. आगामी महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत बहल यांनी अजित दादांशी चर्चा केली, त्यावेळी स्वतः अजित दादांनी ही माहिती दिल्याचेही बहल यांनी म्हटलं आहे. त्यामुळे, दोन राष्ट्रवादी आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधून एकत्र येत असल्याचं दिसून येत आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीनंतर झालेल्या सत्ता नाटकानंतर अजित पवारांनी पक्षप्रमुख शरद पवार यांच्याविरोधात जाऊन राष्ट्रवादीतील आमदारांचा वेगळ गट निर्माण करत सत्तेत सहभाग घेतला होता. त्यामुळे, राष्ट्रवादीत दोन गट निर्माण झाले. त्यातच, शरद पवारांना नवा पक्ष स्थापन करावा लागला. सध्या, राज्यात दोन राष्ट्रवादी काँग्रेस असून एकाचं नेतृत्व शरद पवार करत आहेत. तर, दुसऱ्या पक्षाचे नेते अजित पवार आहेत. मात्र, दोन्ही राष्ट्रवादी एकच असल्याची नेहमीच चर्चा रंगत असते. त्यातच, आता दोन दिवसांपूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड नगरपालिका निवडणुकांसाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे कॅबिनेटमंत्री हसन मुश्रीफ यांनीच ही मध्यस्थी केली असून केवळ भाजपला सत्तेपासून दूर ठेवणे हा आमचा अजेंडा असल्याचं स्थानिक नेत्यांनी म्हटलं आहे. तसेच, बीडमध्येही दोन राष्ट्रवादी एकत्र आल्या असून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीची ताकद नसली तरीही दोन राष्ट्रवादी एकत्र आल्याचं दिसून येत आहे.

### भारताला भविष्यात कोणता धोका? रघुराम राजन यांचा इशारा; मोदी-ट्रम्प मैत्री कुठे गेली?

**मुंबई/प्रतिनिधी :** रिझर्व्ह बँकचे माजी गवर्नर आणि अर्थतज्ज्ञ रघुराम राजन यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेसंदर्भात एक धोक्याचा इशारा दिला आहे. व्यापारी तणाव आणि आयात शुल्क वाढीमुळे देशाला असे नुकसान सहन करावे लागू शकते, जे कधीच पूर्णपणे भरून काढता येणार नाही, असे ते म्हणाले. अमेरिकेच्या आयात शुल्कात झालेल्या वाढीमुळे लहान निर्यातदारांना मोठा फटका बसला असून, उद्योग क्षेत्रात तणाव वाढल्याचे रघुराम राजन म्हणाले. राजन म्हणाले, ''भारताला असे तोटे भोगावे लागतील की... ते कधीच पूर्णपणे मिळणार नाहीत.'' या परिस्थितीमुळे व्यवसायिक संबंध कायमस्वरूपी खराब होण्याचा धोका आहे, ज्यामुळे छोट्या कंपन्यांना नवीन बाजारपेठ शोधणे कठीण होईल. राजन यांनी हे उदाहरण दिले की, अमेरिकन दुकानांमध्ये कपडे विकणाऱ्या एका ओळखीच्या महिलेचा संपूर्ण व्यवसाय थांबला आहे, कारण ५० टक्के आयात शुल्कामुळे तिचे उत्पादने तेथे विक्रीसाठी अवघड झाले आहेत.भारताला चीनच्या वाढत्या व्यापारी सामर्थ्यामुळे अस्वस्थ वाटत आहे. राजन यांनी नमूद केले की, ''भारताला भीती वाटते की चिनी मालाने बाजार भरून जाईल. चीनकडून गुंतवणूकीचे स्वागत आहे पण चीनवर अवलंबून राहणे योग्य नाही.'' देश चिनी उत्पादनांच्या अतिवाढीला रोखण्यासाठी सतर्क आहे. यासाठी भारत जपान आणि ऑस्ट्रेलियाशी संबंध मजबूत करत आहे, तर अमेरिकेशी दीर्घकालीन रणनीतिक भागीदारी वाढवण्याचा प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले. मात्र भारत-अमेरिका संबंध 'फक्त व्यवहारावर आधारित' होत चालले आहेत, ज्यामुळे खोलवर विश्वासार्हता कमी होत आहे.


## शब्दकोडे क्र. 07

आडवे शब्द

१. मूर्ख ४. पूर्ण साठ मिनिटे ७. पुष्कळ, अमर्याद ९. पुरुष १०. दारू (हिंदी) ११. आयातकर १३. कौटिल्याचे एक नाव १४. माळी १६. नौदल १७. ही एक हाताने वाजत नाही १८. वडील २०. श्वासोच्छावास २३. कोठेही जा सर्वत्र सारखीच स्थिती असते, या अर्थाची म्हण २६. नव्वद अंशाच्या आतील कोन २८. कार्य, काज २९. वैयक्तिक, स्वतःचे ३१. चंद्र ३३. सत्व ३५. एक मंगल वाद्य ३६. विष्णुपत्नी ३७. जास्तीत जास्त कमीत कमी ३८. खिन्न, कष्टी ४०. शूर ४१. नूतन ४३. संयोग, संसर्ग, नाते ४५. श्रीकृष्णाचे एक नाव ४७. संतापी, चटकन राग येणारा ४९. नवऱ्याचा भाऊ ५०. लोणी ५३. वाळवंट ५५. पत्ती, तपास, शोध ५६. रड्या माणूस ५७. हलाहल पचवणारा याअर्थी शंकराचे नाव ५९. हाका मारून बोलावणे ६१. धरणे ६३. मातापिता ६६. योगायोग ६९. नाराजी ७०. टिकून राहणे ७१. बारीक ताप

उभे शब्द

१. दुबळा, गरीब २. जनावरांची आरोळी ३. चलनवलन ४. चांदणी ५. निमित्त ६. धोबी ८. पाठोपाठ १०. संभवनीयता १२. चारचाकी वाहनप्रकार १५. एक क्षार १६. आजूबाजूला १७. पाणी साठवण्यासाठी बांधलेला हौद १९. बारा वर्षाचा काळ २०. कुत्रा २१. दाट मैत्री, जवळीक २२. एक पक्षी २४. धनुष्यबाण २५. ठाणवई देवापाशी तेवत ठेवण्याचे एक उंच साधन २७. डोळ्यादेखत २८. अरण्य २९. लोणच्यातील द्रव ३०. एकत्र जमण्यास विरोध करणारा हुकूम ३२. कोल्हापूर शहराचे एक नाव ३४. कमीजबरोबरचे एक वस्त्र ३५. सगळ्यांना सारखाच न्याय, सारखेपणा ३९. मोठा भाऊ ४२. गुंडी ४४. भूकंप ४६. नासक्या दुधाच्या वड्या ४८. पुन्हास ५१. थेट ५२. श्रीकृष्णाच्या प्रेमासाठी विष पचविणारी स्त्रीभक्त ५४. मालक ५५. एक सुगंधी वनस्पती ५८. फसविणे ५९. पुण्याचा रहिवासी ६०. मुख्य पदार्थाबरोबर तोंडी लावण्याचा पदार्थ ६२. एक ऋतु ६३. ज्वाला, दाह, अग्नी ६४. पादत्राण ६५. दुःख, सल, बोच ६७. हादरा, नौका उभी करण्याची जागा ६८. संयोग, प्रसंग



### शब्दकोडे क्र. 06 चे उत्तर

आडवे उत्तर

१.वैदेही ४.आराम ६.सदाशिव ८.खारट ११.वानवा १३.लहानसर १४.साल १५.राजाराम १८.हयगय १९.मयत २१.वतन २२.गाज २३.नवल २५.डहाळी २७.कथन २८.सकल ३१.मधुकर ३२.पाव ३३.मानवता ३४.रास ३६.जीव ३८.डामडौल ४०.मुजरा ४१.पातळ ४२.मोगरा ४४.भेदक ४६.कलकत्ता ४८.लवाद ४९.दर ५०.ओळख ५२.दवा ५५.वाफाळ ५७.डगर ५८.भारत ६०.वाकस ६२.विजार ६२अ.नख ६३.मखर ६५.डळमळीत ६६.कर्ता ६७.जप ६८.नाका ६९.लगत ७१.टपाल ७३.फटफटी ७४.राज ७५.कोळ ७६.मासा ७७.खार ७८.काक ७९.नकार ८०.जरकबरक ८१.कीर ८२.सय

उभे उत्तर

२.देवालय ३.हीन ५.रातोरात ६.समूहगान ७.वलय ८.खानदान ९.रस १०.टरफल १२.वारा १४.साम दाम दंड भेद १६.जावळी १७.मनकवडा १८.नर १८अ.यज २०.तडक २४.वनराज २६.हारजीत २८.सन २९.कवडीमोल ३०.लता ३३.मालमत्ता ३५.सराईत ३७.वळवळ ३९.मजलदरमजल ४०.मुराद ४१.पाक ४३.गवाक्ष ४५.दरवाजा ४७.कवा ५०.ओळ ५१.खडखडाट ५३.पोर ५४.पाकळी ५६.फारकत ५८.भार ५९.तडकाफडकी ६०.वामन ६१.सतलज ६२.विशालकोन ६४.खप ६८.नाट ७०.गळका ७२.पालक ७३.फरक ७४.राकस ७६अ.साज ७७.खार

# नगरपरिषद निवडणुका : तिसऱ्या दिवशी फक्त पाच उमेदवारी अर्ज दाखल

## १५ नोव्हेंबरनंतर उमेदवारी अर्जांच्या पोळ्याचा फुटण्याचा अंदाज

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील ११ नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास १० नोव्हेंबरपासून सुरुवात झाली असली, तरी पहिल्या दोन दिवसांत फारशी हालचाल दिसली नाही. मात्र तिसऱ्या दिवशी म्हणजेच १२ नोव्हेंबर रोजी केवळ पाच उमेदवारी अर्ज दाखल झाले असून, या प्रक्रियेला अजून गती मिळायची आहे.

बुलढाणा नगरपरिषद सदस्यपदासाठी एक, चिखलीसाठी एक, मलकापूरसाठी एक, शेगावसाठी एक व सिंदखेडराजासाठी एक अशा




पाच नगरपरिषदांसाठी अर्ज दाखल झाले आहेत.

जिल्ह्यात एकूण ११ नगरपरिषद असून त्यामध्ये बुलढाणा, चिखली, देऊळगाव राजा, खामगाव, लोणार, मलकापूर, मेहकर, नांदुरा, शेगाव व सिंदखेडराजा या नगरपरिषदेचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज १७ नोव्हेंबरपर्यंत दाखल करता येणार आहेत.

### अध्यक्षपदासाठी अजूनही शून्य अर्ज!

नगरपरिषद सदस्यपदासाठी काही हालचाल दिसली असली तरी, नगराध्यक्षपदासाठी एकही अर्ज दाखल झालेला नाही. सर्वच नगरपरिषदेतील संभाव्य उमेदवार सध्या आपल्या राजकीय समीकरणांचा मेळ घालत, पायाभूत चर्चा व सल्लामसलत करण्यात व्यस्त आहेत. नगराध्यक्ष हे प्रतिष्ठेचे पद असल्याने प्रत्येक पक्ष सावध पावले टाकत आहे. विरोधकांकडून कोण उमेदवार दिला जातो आणि त्याला समोरासमोर प्रतिस्पर्धी देण्यासाठी कोण सक्षम ठरेल यावरच सध्या चर्चा रंगल्या आहेत.

राजकीय वर्तुळातील जाणकारांचे म्हणणे आहे की, १५ नोव्हेंबरनंतर अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्जांचा ''पोळा फुटेल'' आणि निवडणुकीच्या रणधुमाळीला खरा रंग चढेल.

पहिल्या तीन दिवसांत केवळ पाच अर्ज दाखल झाल्यामुळे इच्छुकांनी अद्याप प्रतीक्षा ठेवली आहे. तथापि, १५ नोव्हेंबरनंतर उमेदवारांची मोठी गर्दी उसळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चेत आहे.

---

### वृत्तविशेष...

## पर्पल फूड कॉर्नर कॅफेवर मेहकर पोलिसांचा छापा; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर शहरातील लक्ष्मीनारायण कॉम्प्लेक्समधील पर्पल फूड कॉर्नर कॅफे येथे अवैध व्यवसाय सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर मेहकर पोलिसांनी १० नोव्हेंबर रोजी छापा टाकून पाच आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित कॅफेमध्ये तरुण-तरुणींना असभ्य वर्तन करण्यासाठी खोल्या भाड्याने दिल्या जात असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. पोलिसांच्या कारवाईदरम्यान चौकशी केली असता, आरोपी कार्तिक नारायण चापले व निलेश शरद सोमन यांनी कार्तिक गणेश चव्हाण याच्या भागीदारीत कॅफे सुरू करून त्यामध्ये दोन मजल्यांवर खोल्या तयार केल्याचे आढळून आले. या खोल्या जादा दराने भाड्याने देऊन शासनाच्या आदेशांचे व नियमांचे उल्लंघन करण्यात येत होते.

पो.उ.नि. गणेश भगवान कड यांनी दिलेल्या तक्रारीवरून संबंधित आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.हे.का. सदानंद चाफले हे करीत आहेत.

## मेरी पॉलिसी मेरे हाथ उपक्रमांतर्गत जनजागृती ; पिक विमा संदर्भात वांगी येथे मार्गदर्शन




दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी:** प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत मेरी पोलिसगिरी हात या जनजागृती उपक्रमाला वाशिम तालुक्यात प्रतिसाद मिळत असून या उपक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांपर्यंत पिक विमा संरक्षणाचे महत्त्व पोहोचविणे आणि त्यांना त्यांच्या ही पॉलिसी ची प्रत्यक्ष हातात देणे असा आहे मेरी पॉलिसी मेरे हाथ या मोहिमेअंतर्गत २९ ऑक्टोबर रोजी वाशिम तालुक्यातील वांगी येथे शेतकरी सभा घेण्यात आली. यावेळी नवनाथ मगरे जिल्हा व्यवस्थापक भारतीय कृषी विमा कंपनी वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय कृषी विमा कंपनीचे प्रतिनिधी नितीन घुगे व आकाश पडघान शेतकऱ्यांसाठी फसल बीमा पाठशाला आयोजित केली होती सभेत शेतकऱ्यांना कृषी विम्याचे महत्त्व, विमा अर्ज प्रक्रियेतील क्युआर चॅट बॉट कोड, कृषी रक्षक पोर्टलचा वापर या बाबी सह विविध विषया संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

## हंगामानुसार शिफारस केलेल्या बियाण्यांची विक्री करा - जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्र संचालकांनी बियाणे कायद्याचे पालन करून केवळ त्या-त्या हंगामासाठी शिफारस केलेल्या बियाण्यांचीच विक्री करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

खरीप, रब्बी किंवा इतर विशिष्ट हंगामासाठी शिफारस केलेले बियाणे केवळ त्या शिफारस केलेल्या हंगामातच विक्रीसाठी ठेवावे. हंगामाबाह्य बियाण्यांची विक्री पूर्णपणे टाळावी. खरीप किंवा लेट खरीप हंगामासाठी शिफारस केलेले कांदा किंवा इतर बियाणे रब्बी हंगामात विक्रीस ठेवू नयेत. त्याचप्रमाणे, रब्बी हंगामासाठी शिफारस केलेले मका किंवा ज्वारी बियाणे रब्बी हंगाम संपल्यानंतर विक्रीस ठेवू नयेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.कृषी केंद्र संचालकांनी हंगामबाह्य बियाणे विक्रीसाठी कंपन्यांकडून खरेदी करणे तात्काळ थांबवावे. शेतकऱ्यांनी अशा बियाण्यांची खरेदी केल्यामुळे नुकसान झाल्यास संबंधित कृषी केंद्र संचालक यांना जबाबदार धरले जाईल. त्यांच्या विरोधात बियाणे कायद्यानुसार कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिला आहे.जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योग्य हंगामात योग्य बियाणे उपलब्ध व्हावेत आणि त्यांच्या हिताचे रक्षण व्हावे यासाठी ही सूचना जारी करण्यात आली असून सर्व कृषी केंद्र संचालकांनी या सूचनेची अंमलबजावणी त्वरित व काटेकोरपणे करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# चंद्रशेखर बावनकुळे भाजपचे महाराष्ट्र निवडणूक प्रभारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महसूलमंत्री व माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भाजपच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महाराष्ट्र निवडणूक प्रभारी म्हणून निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नावाची घोषणा केली.

बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्रात महायुतीच्या माध्यमातून ५१ टक्के मते घेऊन दोन-तृतीयांश बहुमताने महाराष्ट्राच्या सर्व निवडणुका जिंकू. राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व जिल्हा परिषद आणि नगरपालिका, नगरपंचायती यांमध्ये भाजप-महायुती ही प्रचंड बहुमताने विजयी होईल असा मला विश्वास आहे.

मंगळवारी सकाळी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या



उपस्थितीत प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली भाजपच्या महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या जिल्हा प्रभारींची बैठक झाली. या बैठकीस पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राज्यातील विविध भागांतील संघटन मंत्री, महामंत्री, मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. तब्बल तीन तास राज्यातील सर्व निवडणुकांचे विभागनिहाय सादरीकरण बैठकीत करण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रभाऱ्यांना जास्तीत जास्त महायुतीवर भर देण्याच्या, मित्रपक्षांवर टीका-टिप्पणी न करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. यानंतर प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची भाजपचे महाराष्ट्र निवडणूक प्रभारी म्हणून घोषणा केली.

महायुतीमध्ये स्थानिक पातळ्यांवर मतभेद असल्याने जागावाटपावरून चर्चे दरम्यान वाद, रुसवे-फुगवे, स्वबळ अथवा इतरांसोबत युती असे होण्याची शक्यता आहे.

महायुतीत समन्वयासाठी प्रयत्न : बावनकुळे म्हणाले की, महायुतीत समन्वय टिकवण्यासाठी प्रयत्न केले जातील. या समन्वयासाठी प्रत्येक जिल्ह्यात तीन मंत्र्यांची समिती असेल. यामध्ये एक भाजप, एक शिवसेना आणि एक राष्ट्रवादी असे तीन मंत्री समन्वयक म्हणून काम करणार आहेत. महायुतीतील मित्रपक्षांमध्ये कुठेही मतभेद आणि मनभेद होणार नाहीत, याची काळजी भाजप घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय १५ व १६ रोजी सुरु

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२५ जाहीर करण्यात आलेला आहे. राखीव जागांसाठी निवडणूका लढविण्यास इच्छुक उम `दवारांकडून जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याची अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर असून निवडणूक लढविणाऱ्या अर्जदारांची गैरसोय होऊ नये याकरिता शनिवार, १५ व रविवार १६ नोव्हेंबर या दोन्ही सुट्टीच्या दिवशी फक्त निवडणूकविषयक अर्ज स्विकारण्यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय सुरु ठेवण्यात येत आहे.

---

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना; ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे. योजनेंतर्गत इच्छुक विद्यार्थ्यांकडून ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ११ वी, १२ वी व त्यानंतरचे व्यावसायिक तसेच बिगर व्यावसाईक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेले, सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केलेले व शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेनंतर वस्तीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सोयी-सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु करण्यात आलेली आहे.

जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेच्या निकषानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता ऑनलाईन पध्दतीने https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज करणे करणे आवश्यक आहे. मागील शैक्षणिक वर्षात स्वाधार योजनेकरीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी सुध्दा योजनेच्या निकषाप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे. स्वाधार योजनेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी कार्यालयातील सुचना फलकावर लावण्यात आलेली असून विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही तांत्रिक अडचणी येत असल्यास सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

---

### बीडमध्ये नेत्यांचे पक्षांतराचे सोहळे

# धोंडे, खांडे, देशमुख यांचे पक्षांतर, हेमंत क्षीरसागरही वाटेवर

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यात नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतराला वेग आला असून, भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मंगळवारी मुंबईत प्रवेश केला. धोंडे यांची ओळख भाजपचे आमदार सुरेश धस यांचे कट्टर विरोधक व मंत्री पंकजा मुंडे यांचे समर्थक म्हणूनच सर्वश्रुत आहे.

दोन्ही शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख राहिलेले कुंडलिक खांडे यांनीही मंगळवारीच पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवबंधन बांधले. क्षीरसागर घराण्यातील तरूण नेते हेमंत क्षीरसागर हेही सत्ताधारीपैकी एका प्रमुख पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. हेमंत क्षीरसागर हे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार संदीप क्षीरसागर यांचे बंधू आहेत.

दोन दिवसांपूर्वी परळीचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे (अजित पवार) आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय दीपक देशमुख यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी स्वत: शरद पवार, बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार जितेंद्र आव्हाड, प्रदेश सरचिटणीस राजाभाऊ फड यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपले काका तथा भाजपचे राज्यातील मातब्बर नेते दिवंगत गोपीनाथ मुंडे यांना धनंजय मुंडे यांनी परळीत जेव्हा आव्हान दिले तेव्हा नगराध्यक्षपदासाठी दीपक देशमुख यांचे नाव पुढे केले होते. धनंजय मुंडे यांच्या या राजकीय खेळीत दीपक देशमुख हे नाव राज्याला परिचित झाले होते. त्यापासून देशमुख हे कट्टर धनंजय मुंडे समर्थक म्हणून ओळखले जात होते. परंतु अलिकडे दीपक देशमुख हे धनंजय मुंडे यांच्यापासून दुरावले होते. अखेर त्यांनी धनंजय मुंडे यांच्यापासून फारकत घेत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. यानंतर माध्यम प्रतिनिधींशी बोलताना विधानसभा निवडणुकीत परळीमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस मतदान झाले असून, नगर परिषदेतही विकासकामे न करताच निधी हडपला जात असल्याचा आरोप करत धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले आहेत.

---

# महाराष्ट्र गरीबग्रेड संघटनेचा डोणगाव येथे भव्य मोर्चा वीज बिल कमी व मोफत वीजसाठी लढा तीव्र

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** महाराष्ट्र गरीबग्रेड संघटनेच्या वतीने दिनांक १२ नोव्हेंबर बुधवार दुपारी एक वाजता डोणगाव येथे वीज ग्राहकांच्या विविध मागण्यांसाठी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चाचे नेतृत्व संघटनेचे डोणगाव शहर प्रमुख सज्जनराव आखाडे यांच्या नेतृत्वात, तसेच संघटनाप्रमुख दिलीप भैय्या गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

मोर्चाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे डोणगाव आणि परिसरातील नागरिकांना मनमानी वीज बिल आकारणीपासून दिलासा मिळावा, तसेच गरिबांना मोफत वीज बिल देण्यात यावे, या मागण्या शासनापर्यंत पोहोचविणे हे होते.

संघटनेचे संपर्क कार्यालय




येथून मोर्चाला सुरुवात झाली. मात्र आचारसंहितेमुळे प्रशासनाकडून परवानगी न मिळाल्याने पोलिस प्रशासनाने मोर्चाचे आयोजन थांबवले. यावेळी डोणगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे तसेच एम एस बीचे अभियंता घटनास्थळी उपस्थित राहून आंदोलकांच्या मागण्यांवर चर्चा केली. अखेरीस आंदोलकांना लेखी आश्वासन देण्यात आले की, काही दिवसांत वीज बिलाशी संबंधित मागण्यांचा विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

या लेखी आश्वासनानंतर मोर्चाची सांगता शांततेत करण्यात आली. मात्र, ''जर ठरलेल्या मुदतीपर्यंत मागण्यांची पूर्तता झाली नाही, तर संघटना उग्र आंदोलन छेडेल,'' असा इशारा संघटनाप्रमुख दिलीप भैय्या गायकवाड यांनी दिला. या मोर्चाला संघटनेचे विदर्भ प्रदेश संपर्कप्रमुख प्रवीण दादा काठोळे, प्रदेश निरीक्षक मुरलीधरजी निकाळजे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर पवार, पदाधिकारी दिनकर मैंद, राज्यात शहा, शब्बीर भाई, जिल्हाध्यक्ष गजानन मेटांगळे तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.